I J R S S I S, Issue (IX), Vol. (I), May 2023: 186-190
A Double-Blind Peer Reviewed Journal
OPEN ACCESS
e-ISSN 2347 – 517X
Original Article

Reg. No. : MH-NGP/0000167
INTERNATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCE AND INFORMATION STUDIES
© VMS RESEARCH FOUNDATION www.ijrssis.in

# अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यावरील आंबेडकरवादाचा प्रभाव

**सरोज एन. शिंगाडे व जगदिश्वर मेश्राम**
डॉ. बाबासाहेब आंबेडकर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, ब्रम्हपुरी जि. चंद्रपूर
*Corresponding Author :- sarojshingade1979@gmail.com, jagdishm.17@gmail.com

Communicated : 25.01.2023 | Revision : 02.03.2023 Accepted : 30.03.2023 | Published : 30.05.2023

**सारांश :**

आंबेडकरवादाचे पुरस्कर्ते, साम्यवादाचे प्रवर्तक, लोकसाहित्यिक, लोकशाहीर, प्रतिभावंत लेखक अण्णा भाऊ साठे हे मराठी साहित्यातील एक बहुआयामी व्यक्तिमत्व होय. त्यांचे लेखन हे खऱ्या अर्थाने फुले, आंबेडकरी सामाजिक समतेच्या विचाराने प्रभावित होते. 'जग बदल घालुनी घाव, गेले सांगूनी मला भिमराव' या प्रमाणे आयुष्यभर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांना त्यांनी स्वत:ला अर्पण केले. त्यांचे साहित्य सामाजिक समतेचा विचार मांडणारे होते. तळागाळातील लोकांचे साहित्य त्यांनी मांडले असून एक संवेदनशील कलावंत म्हणून त्यांनी त्यांचे संपूर्ण आयुष्य खर्ची घातले. जो समाज साहित्याच्या मुख्य प्रवाहापासून दूर होता त्या समाजाला त्यांनी साहित्याच्या केंद्रस्थानी आणण्याचे कार्य केले. दलित, शोषित, वंचित, पिडित, गावकुसाबाहेरील, चोर, दरोडेखोर, वेश्या, मुरळी, जोगतीन यासारख्या सामाजिक जीणं नाकारलेल्या लोकांना त्यांनी आपल्या साहित्यात नायकपण दिले. अण्णाभाऊंचा पिंड मार्क्सवादी असल्यामुळे साम्यवादाचा त्यांच्या जीवनावर प्रभाव होता. असे असले तरी त्यांच्या जगण्यात जन्माचे जे दलितपण होते त्या दलितपणामुळेच पुढील काळात ते डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक समतेच्या आंदोलनाचे पाईक ठरले. त्यांच्या साहित्याचा पूर्वार्ध जरी मार्क्सवादी असला तरी उत्तरार्ध हा आंबेडकरवादाने भारलेला आहे. बुद्धाची शांतता, फुलेंची सामाजिक क्रांती, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे मानवतावादी, विषमता विरोधी , समतेचे लढे हे त्यांच्या साहित्याचे प्रेरणास्थान होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या धम्मक्रांतीचा त्यांच्या संवेदनशील मनावर खोलवर प्रभाव पडला. या प्रभावामुळेच पुढे त्यांनी आपली साहित्यनिष्ठा आंबेडकरवादास अर्पण केली. या आंबेडकरवादी विचारांच्या उर्जेच्या प्रभावाने त्यांनी झपाटून तळागाळातील, गावकुसाबाहेरील लोकांचे जगणे जगाच्या समोर मांडले. 'जे जगले, अनुभवले तेच मांडले. मी ठरवून काही लिहित नाही' हे त्यांचे विचार त्यांच्या दलितपणाच्या असण्यात, जगण्यातच दिसते. या दलितपणाच्या जाणीवेमागे एक विचार आहे तो विचार म्हणजे 'आंबेडकरवाद' होय. हा आंबेडकरवाद डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या महापरिनिर्वाणानंतर अधिकच दृढ झाला. आंबेडकरवाद हा त्यांच्या जीवनाचा श्वास आणि ध्यास बनला. यातूनच अण्णा भाऊंनी आंबेडकरवादी साहित्याची निर्मिती केली. या आंबेडकरवादाचा त्यांच्या साहित्यावर पडलेला प्रभाव व त्यातून निर्माण झालेले साहित्य याचा अभ्यास प्रस्तुत ''अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यावरील आंबेडकरवादाचा प्रभाव'' या शोधनिबंधात मांडलेला आहे.

**मुख्यशब्द :** आंबेडकरवाद, मार्क्सवाद, बहुआयामी, साहित्यनिष्ठा, दलितपण, गावकुसाबाहेरील .

**प्रस्तावना :**

ग्रामीण महाराष्ट्रातील अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या मातंग समाजामध्ये लोकशाहीर अण्णा भाऊ साठे ऊर्फ तुकाराम भाऊराव साठे यांचा जन्म १ ऑगष्ट १९२० रोजी सांगली जिल्हयातील वाळवा तालुक्यातील वाटेगावात झाला. मातंग समाजातील शेतकरी कुटूंबात त्यांचा जन्म झाला असला तरी दु:ख, दैन्य, दुष्काळ, रोगराई, भूक, सावकारी, जमीनदारी, ब्रिटीश सरकारची शिरजोरी या वातावरणात ते वाढत होते. हाणामारी, दरोडेखोरी, गोळीबार, पळापळ अशा धामधुमीत त्यांचे बालपण गेले.

दिड दिवसाच्या शाळेत जाऊन त्यांनी शिक्षण घेतले व पुढे वयाच्या १२ वर्षी पोटाची खडगी भरण्यासाठी त्यांनी आई वडिलांसोबत अनवाणी पायाने मुंबई गाठली. जवळ जवळ २०० मैलाचे अंतर पोटात भूकेची आग घेऊन त्यांनी पूर्ण केले. पुढे मुंबईला त्यांनी कोळसे भरणे, घरगडी, कुत्री सांभाळणारा नोकर, डोअरकिपर, गिरणी कामगार असे अनेक कामे करून पुढे ते कम्युनिस्ट पक्षाचे कार्यकर्ते म्हणून जनसामान्यांना परिचित झाले. त्यांनी फेरीवाल्यांच्या सोबत ओझे वाहतांना मुंबईच्या रस्त्यावरील पाट्या वाचीत—वाचीत स्वत:ची अक्षर ओळख दृढ केली.

'जे पाहिले, अनुभवले, तेच लिहिले' या तत्वाप्रमाणे अण्णा भाऊंनी साहित्यात जीवनानुभव मांडले. आठ वर्षाच्या वयात त्यांनी गावोगावी जावून तमाशातून सोंगाड्या वठविला. त्यांनी या जीवनानुभवातून 'फकिरा', 'वैजंयता', 'चित्रा', 'आवडी', 'चंदन', 'चिखलातील कमळ' यासारख्या ३४ कांदबऱ्या, अनेक कथासंग्रह, पोवाडे,

लावण्या, प्रवासवर्णन इत्यादी विपुल साहित्य निर्मिती केली. या साहित्यात त्यांनी स्वानुभवनातून भोगलेल्या दलितपणाच्या वेदना मांडल्या. ही त्यांच्या वेदनांची संवेदनशील जाणीव म्हणजे त्यांचा आंबेडकरवादाकडील प्रवास होय.

अण्णा भाऊ जन्माने दलित आणि वृतीने साम्यवादी असल्यामुळे कामगार, मजूर, शोषित, वंचित, हीन–दिन, गावकुसाबाहेरील माणुस, गुंड, बंडखोर, दरोडेखोर, वेश्या, भिकारी हे त्यांच्या जीवनाचे अविभाज्य भाग होते. त्यांचे दु:ख, दैन्य, वेदना याची जाणीव त्यांना होती. याच जाणीवेतून त्यांनी दलितांचे जीवन, दलितांच्या व्यथा, त्यांच्या भावभावना याचे चित्रण आपल्या साहित्यातून केले. हे उपेक्षिताचं जीणं त्यांच्या साहित्याचा केंद्रबिंदू बनले. त्यांची ही उपेक्षा अण्णा भाऊंनी गावकुसाच्या वेशीवरून जगाच्या समोर मांडली. पोटाची भूक माणसाला शहाणपण शिकविते. या भूकेमुळे त्यांना हमाला पासून ते गिरणी कामगाराचा प्रवास मुंबईत करावा लागला. या प्रवासात अण्णा भाऊ कामगारांच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी कम्युनिस्टांच्या संपर्कात आले. या प्रभावातून अण्णा भाऊंनी कम्युनिस्ट विचारसरणी स्विकारली असली तरी त्यांच्यातील दलितपणाची वंचना त्यांना स्वस्थ बसू देत नव्हती. याच काळात महाराष्ट्रात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे सामाजिक विषमता विरोधी क्रांतीविचार वाहत होते. या विचाराने अण्णा भाऊ प्रभावित होत होते. अण्णा भाऊंना या काळात कम्युनिस्टांच्या आर्थिक विषमता विरोधी विचाराबरोबरच डॉ. बाबासाहेबांच्या सामाजिक समतेचे विचार अधिक प्रभावशाली वाटू लागले. यातूनच अण्णा भाऊ साठेंचे दलितपण जागे झाले. या दलितपणाला न्याय देण्यासाठी हिनवल्या गेल्यांचे दु:ख, दैन्य, दास्य हा त्यांच्या साहित्याचा भाग बनून पुढे त्यांनी उपेक्षितांचे साहित्य निर्माण केले. त्यांच्या "सापळा, उपकारांची फेड, वळण, बुद्धाची शपथ या कथांमधून त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीचे महत्व सांगितले असून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्विकारलेला मार्ग हाच दलित शोषितांच्या मुक्तीचा मार्ग आहे असे अण्णा भाऊ सुचवितात."१ असे डॉ. सोमनाथ कदम म्हणतात. त्यांचे हे विचार अण्णा भाऊंवरील आंबेडकरवादाचा प्रभाव स्पष्ट करणारे ठरते.

अण्णा भाऊ साठे हे लोकसाहित्यिक होते. त्यांनी कम्युनिझमचा स्विकार सारासार विचार करून केला. ते झापडबंद किंवा पोथीनिष्ठ कम्युनिस्ट नव्हते. भारतातील परिस्थितीला अनुसरून त्यांनी कम्युनिस्ट विचारसरणी स्विकारली होती. त्यामुळे त्यांच्या साहित्याचा पूर्वार्ध कम्युनिस्टवादी असला तरी उत्तरार्ध हा आंबेडकरवादी आहे. डॉ. बाबुराव गुरव यांनी म्हटल्याप्रमाणे ''ते जरी कम्युनिस्ट पक्षाचे कार्डधारक कार्यकर्ते होते तरीही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सर्व सामाजिक चळवळी बरोबर ते सहकार्य करीत होते.''२ यावरून हेच दिसते की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा प्रभाव अण्णा भाऊंवर होता.

अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्याची प्रेरणा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या क्रांतीविचारात होती. १९२५ ते १९४० या कालावधित डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे सामाजिक समतेचे लढे त्यांनी प्रत्यक्षदर्शी पाहिले होते. त्यांच्या सामाजिक समतेच्या चळवळीचा प्रभाव अण्णा भाऊंवर पडत गेला. १९४९ साली मुंबईत अण्णा भाऊ साठे आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची समोरासमोर भेट झाली. या भेटीने अण्णा भाऊ भारावले होते. १९४६ मध्ये अण्णा भाऊंनी लिहिलेल्या 'देशभक्त घोटाळे' या लोकनाट्यतून जे समतावादी विचार व्यक्त केले त्याची प्रेरणा त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारातून घेतली असावी. जग बदलण्यासाठी अन्यायाच्या वर्मावर

घाव घालण्याचे विचार मला डॉ. बाबासाहेब आंबेडकर देतात. ''जग बदल घालूनी घाव गेले, सांगूनी मला भिमराव''३ असे अण्णा भाऊ लोकनाट्यतून मांडतात. समतेचा रथ एकजुटीने पुढे नेण्याचा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा विचार या लोकनाट्यतून तळागाळातील लोकांमध्ये पेरतांना दिसतात. हेच अण्णा भाऊंच्या लेखनातील आंबेडकरवादाच्या प्रभावाची स्पष्टोक्ती देते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे गुरू महात्मा फुले यांनी सामाजिक समतेसाठी सत्यशोधक चळवळ उभारली. 'ब्राम्हणांचे कसब' हा सत्यशोधक ग्रंथ महात्मा फुलेंनी कुणबी, माळी, महार, मांग या समाजास अर्पण केला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 'हु वेअर शुद्रा' हा ग्रंथ आपले गुरू महात्मा फुले यांना अर्पण केला. तसेच अण्णा भाऊंनीही आपली 'फकिरा' ही सर्वश्रेष्ठ कादंबरी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या झुंजार लेखनीस अर्पण केली. यावरून अण्णा भाऊ साठे यांची वैचारिक परंपरा ही महात्मा फुल्यांपासून पुढे कशी प्रवाहित झाली याचे दर्शन घडविते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या महापरिनिर्वाणाचा सखोल परिणाम अण्णा भाऊंच्या संवेदनशील मनावर झाला. फुले–आंबेडकर यांच्या समतावादी विचारांच्या प्रभावाने अण्णा भाऊंचे लेखन प्रभावी झाले. त्यांनी आपल्या लेखनीला धार दिली. अलौकिक बुद्धिमत्तेच्या अण्णा भाऊंनी मराठी साहित्यामध्ये 'वैजयंता', 'चित्रा', 'फुलपाखरू', 'चिखलातील कमळ', 'चंदन' या सारख्या अद्वितीय कादंबऱ्यांची निर्मिती केली. दलित स्त्री, वेश्या, तमासगीर, मुरळी या सारख्या उपेक्षित स्त्रियांना नायिकत्व दिले. कष्टकरी, शोषित, पिडित समाजाच्या माणुसपणाचे महत्त्व अण्णा भाऊ पटवून देतांना म्हणतात. ''हे जग, ही पृथ्वी शेषाच्या मस्तकावर तरली नसून ती दलितांच्या हातावर तरली आहे.''४ अशाप्रकारची कष्टकऱ्यांबद्दलची निष्ठा मुंबई येथे महाराष्ट्र दलित साहित्य संघातर्फे घेतलेल्या पहिल्या दलित साहित्य संमेलनाच्या उद्‌घाटनीय भाषणात अण्णा भाऊ मांडतांना दिसतात. त्यांनी कष्टकरी जनतेच्या उत्थानासाठी लिहिले. त्यांचे हे लोक उत्थानाचे कार्य डॉ. बाबासाहेबांच्या लोकोद्धाराच्या मूल्यांशी जोडलेले आहे. "देश सुखी व्हावा, समृद्ध व्हावा, इथे समता नांदावी, महाराष्ट्रभूमीचे नंदनदवन व्हावे अशी मला रोज स्वप्न पडतात."५ असे अण्णा भाऊ 'वैजयंता' या कादंबरीच्या प्रस्तावनेत लिहितात. त्यांचा हा साहित्य विचार महात्मा फुलेंच्या सामाजिक समतेची जाणीव करून देतो. 'महाराष्ट्राची परंपरा' या त्यांच्या पोवाड्यतल्या चौथ्या चौकात अण्णा भाऊ महात्मा फुले यांच्या विषयीचा उल्लेख करतांना लिहितात की, ''महात्मा फुले लाभले महाराष्ट्राला ए अन्याय निवारूणी न्याय द्याया दलिताला ए''६ यावरून अण्णा भाऊंची महात्मा फुले यांच्या बद्दलची सामाजिक बांधिलकी स्पष्ट होते. महात्मा फुले यांच्या सामाजिकतेचा समतावाद अण्णा भाऊ आपल्या साहित्यातून मांडताना दिसतात.

महात्मा फुले, राजश्री शाहू महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी समाजातील जातीयता नष्ट करण्यासाठी 'आंतरजातीय विवाह' हा मार्ग सांगितला होता. फुले, शाहू, आंबेडकर यांच्या विचारांची छाप अण्णा भाऊंच्या 'आवडी' या साहित्यकृतीत सापडते. उच्च समाजातील मुलगी व दलित समाजातील मुलगा या कादंबरीचे नायक–नायिका असून आंतरजातीय विवाहाचा संदेश अण्णा भाऊ या कांदबरीतून देतात. ही कांदबरी म्हणजे आंबेडकरवादाचा प्रभावच होय. समाजातील विषमता, जातीयता दूर करण्यासाठी आंबेडकरवादी विचार हाच महत्वाचा उपाय आहे असे अण्णा भाऊ लेखनीतून मांडतात.

अण्णा भाऊ साठेंनी महात्मा फुले, राजश्री शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे समतावादी विचार पाहिले, ते जगले. त्यांना कृतीत उतरविण्यासाठी त्यांनी लेखनीचे हत्यार वापरले. या हत्याराने त्यांनी विषमतावादी वृक्षाच्या मूळाशी घाव घातला. समाजात समतावाद पेरला. त्यांचा हा समतावाद आंबेडकरवादाच्या पुरस्कारातून जन्माला आल्याचे दिसते.

अण्णा भाऊ कम्युनिस्ट कार्यकर्ते असले तरी ते कर्मठ नव्हते. ते स्वतंत्र विचाराचे कम्युनिस्ट होते. सांगितलेल्या गोष्टीवर डोळेझाकपणे विश्वास ठेवत नव्हते. कम्युनिझम ने सांगितलेल्या सर्वच गोष्टींना ते कवटाळून बसले नाहीत. अण्णा भाऊंच्या मते समाजात दोनच वर्ग. एक श्रीमंतांचा पिळवणूक करणारा, दुसरा गरिबांचा पिळवणूक सहन करणारा. यांचा वर्ग संघर्ष होऊन एक दिवस पिळवणूक सहन करणाऱ्यांचा विजय होईल आणि समाजात समता येईल असा दृढ आशावाद त्यांना होता. या आशावादाला जगविण्यासाठी त्यांनी लढणाऱ्या माणसांचे साहित्य लिहिले. शोषणाविरूद्ध झगडणारा शोषित, दलित माणुस त्यांच्या साहित्याचा केंद्रबिंदू बनला. त्यांना न्यायाची चाड आणि अन्यायाची चिड होती. हे त्यांच्या साहित्याचे नितितत्व असल्यामुळे कोणावर अन्याय करायचा नाही आणि अन्याय सहनही करायचा नाही हे त्यांच्या साहित्याचे मर्म बनले. यातूनच अनेक नितीवान, स्वाभिमानी, शिलवान, झुंजार, लढवय्ये, नायक– नायिका त्यांनी त्यांच्या साहित्यातून साकारलेले आहेत. ‘भाकरी पेक्षा इज्जत प्यारी आहे’, ‘चारित्र्य माझा अलंकार आहे’ असा स्वाभिमानी बाणा त्यांच्या साहित्यातील नायक–नायिकात दिसून येतो. हे स्वाभिमानाचे जगणे बुद्धाच्या ‘प्रज्ञा–शिल–करूणा’ या तत्वाच्या आधारे त्यांनी लिहिलेल्या ‘बुद्धाची शपथ’ या त्यांच्या कथेमधून रेखाटलेले आहे.

अण्णा भाऊंनी मेंदूच्या जोरावर मन आणि मनगट बळकट केले. समताधिष्ठीत समाजनिर्मितीसाठी अण्णा भाऊंनी विश्वातील शोषित, पिडित, दिन दु:खीतांच्या दु:खाला जगाच्या समोर मांडले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय या बुद्धाच्या तत्वांना लेखनीच्या तलवारीने उजागर केले. हे लेखनीचे शस्त्र अण्णा भाऊंनी दलित, वंचितांच्या उद्धारासाठी अस्त्र म्हणून वापरले.

अण्णा भाऊ साठेंच्या साहित्यातून आर्थिक विषमता विरोधी मार्क्सवाद दिसत असला तरी आयुष्याच्या उत्तरार्धात सामाजिक विषमता विरोधी संघर्षाचा आंबेडकरवादी प्रभाव त्यांच्यावर दिसतो. अण्णा भाऊंनी पूर्वाश्रमीच्या अस्पृश्य जातीत जन्माला आल्यामुळे भोगलेल्या यातना, कमालीचे उपेक्षितपण, अवहेलना, सोसलेले दैन्य, भोगलेले दारिद्रय हे त्यांच्या आंबेडकरवादावर निष्ठा ठेवण्यास कारण ठरले. त्यांच्या ह्या आंबेडकरवादी प्रभावाची झलक ‘सापळा’, ‘उपकरांची फेड’, ‘वळणं’, ‘बुद्धाची शपथ’ या सारख्या कथांमधून प्रकर्षाने जाणवत राहते. त्यांचे हे साहित्य अण्णा भाऊंच्या आंबेडकरवादाची साक्ष पटवून देतात. त्यांच्या साहित्यातील दलित, पिडित, शोषित माणूस डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या समतेच्या आंदोलनाचे नेतृत्व करतांना दिसतो. अन्यायाविरूद्ध दण्ड थोपटतो. स्वत:चा स्वाभिमान जोपासतो. जगण्यासाठी–लढण्यासाठी झगडतो, धडपडतो, उठतो, पडतो पण निराश न होता आशेने लढतो. उद्याचा बदल पाहण्यासाठी अण्णा भाऊ यांच्या साहित्यात दिसनारा दुर्दम्य आशावादी विचार हा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या क्रांतीचा विचार प्रभावच होय. हा क्रांती विचार धगधगत ठेवण्याचे कार्य अण्णा भाऊ यांनी शर्थीने, प्राणपणाने व निष्ठेने पार पाडले. जग बदलण्याचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्वप्न काळजात

रूतवून त्यांनी ते आपल्या निष्ठेने जपले, जगले, जोपासले.

यावरून हेच लक्षात येते की, अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यावर मार्क्सवादाचा पगडा असला तरी सामाजिक समतेसाठी त्यांनी आंबेडकरवादाचा प्रभाव प्राणपणाने व निष्ठेने जोपासला. यातच त्यांच्या आंबेडकरवादी प्रभावाचे गमक आहे.

**संदर्भ :**

डॉ. सोमनाथ कदम, (२०२०), अण्णा भाऊ साठे साहित्य आणि तत्वज्ञान , सुगावा प्रकाशन, पुणे, प. आ., पृ.क्र. ७४

डॉ. बाबुराव गुरव, (२०१५), लोकशाहिर साहित्यसम्राट अण्णा भाऊ साठे गौरव ग्रंथ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे, दु. आ. पे. क्र. ८२

यशवंत मनोहर, (१९७८) 'दलित साहित्य सिद्धांत आणि स्वरूप', प्रबोधन प्रकाशन —५, नागपूर, प. आ., पृ. क्र. ११३

डॉ. अविनाश सांगोळकर, (२०१५), लोकशाहिर साहित्यसम्राट अण्णा भाऊ साठे गौरव ग्रंथ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे, दु. आ. पे. क्र. १११

यशवंत मनोहर, (१९७८) 'दलित साहित्य सिद्धांत आणि स्वरूप', प्रबोधन प्रकाशन —५, नागपूर, प. आ., पृ. क्र. ११८

डॉ. बजरंग कोरडे, (२०१५), लोकशाहिर साहित्यसम्राट अण्णा भाऊ साठे गौरव ग्रंथ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे, दु. आ. पे. क्र. ८५

डॉ. मिलिंद आव्हाड, (२०१७), 'अण्णा भाऊ साठे : जीवन आणि साहित्य', संवाद प्रकाशन प्रा लि. कोल्हापूर,

डॉ. अमर कांबळे (संपादक), शोभा चाळके, (२०१७), 'समग्र अण्णा भाऊ साठे', निर्मिती प्रकाशन, कोल्हापूर, १ ऑगष्ट २०१७

अनिल म्हमाने, (२०२०), 'संवेदनशील साहित्यिक अण्णा भाऊ', संवाद प्रकाशन प्रा. लि., राजाराम रोड कोल्हापूर, प. आ.,